सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २४१ | रविवार, दि. २४ मे २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

रवि ज्वेलर्स
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१
सोने-चांदी
आजचे भाव
२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १५२५००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १४२५००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ ११७५००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २६४०/-
भाव प्रती १० ग्राम


# अमळनेरकर उन्हाळ्यातही तहानलेलेच!

## महिनाभरात तीनच दिवस पाणी; पाणीपट्टी वसुली मात्र संपूर्ण वर्षभराची

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- शहरातील नागरिकांना पालिकेकडून ८ते १० दिवसांनी पाणीपुरवठा होत असल्याने भर उन्हाळ्यात पाण्यासाठी अक्षरशः वणवण फिरण्याची वेळ आली असताना मात्र दुसरीकडे नगरपालिका प्रशासन मात्र नागरिकांकडून पाणीपट्टीच्या नावाखाली तुघलकी वसुली करत असल्याचा संताप व्यक्त होत आहे. शहरात महिनाभरात अवघे तीन दिवस पाणीपुरवठा होत असतानाही नागरिकांकडून मात्र वार्षिक तब्बल १८०० रुपये पाणीपट्टी आकारली जात आहे. एवढ्यावरच न थांबता थकीत पाणीपट्टीवर तब्बल २४% व्याजदराने पालिकेने ३१ मार्च अखेर ३९२२१३८/- रुपये व्याजवसुली केली असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.विशेष म्हणजे, आज पालिकेत सत्ताधारी असलेले माजी आमदार शिरीष चौधरी यांनी देखील जुलै २०२४ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री व सध्याचे नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांना पाणीपट्टीवरील २%शास्तीची वसुली थांबवण्यासाठी पत्र दिले होते. तसेच शिरीष दादा चौधरी मित्र परिवाराचे नगरसेवक मागील प्रशासक काळात याच पाणीपट्टीवरील व्याज वसुलीविरोधात विविध आंदोलने, मोर्चे आणि घोषणाबाजी करत होते. "तुघलकी वसुली थांबवून आर्थिक लूट थांबवा", "व्याजमाफी करा" अशा घोषणा देत मुख्याधिकारी कार्यालयात ठिय्या आंदोलन, तसेच प्रतिकात्मक सुरा भेट देत प्रशासनाला धारेवर धरणारे हेच नगरसेवक आता पालिकेत सत्तेत आल्यानंतर मात्र पूर्णपणे शांत झाल्याची चर्चा शहरात रंगली आहे. तसेच माजी मंत्रीआमदार अनिल भाईदास पाटील यांच्या पत्नी शहर विकास आघाडीच्या माजी नगराध्यक्षा जयश्री पाटील यांच्या कार्यकाळात १८०० रुपये वाढीव पाणीपट्टी लागू केली असल्याकारणाने पालिका निवडणुकीपूर्वी नागरिकांच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेणारे शहर विकास आघाडीचे नगरसेवक मात्र पाणीपट्टी या विषयावर आता 'मृग गिळून गप्प' बसल्याची टीका सर्वसामान्यांकडून केली जात आहे.शहरात आधीच तीव्र उष्म्याची लाट असताना अनेक भागांत नागरिकांना जलकुंभांच्या नळावर, टँकरवर किंवा खासगी पाण्यावर अवलंबून राहावे लागत आहे. काही ठिकाणी महिलांना आणि ज्येष्ठ नागरिकांना पाण्यासाठी लांब रांगा लावाव्या लागत असून, रोजच्या जीवनावर त्याचा गंभीर परिणाम होत आहे. पाणीपुरवठ्याची कोणतीही ठोस आणि नियमित व्यवस्था नसताना पालिकेकडून मात्र कर वसुलीत कुठलीही तडजोड केली जात नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.दरम्यान, "महिन्यात फक्त तीन दिवस पाणी देणाऱ्या पालिकेला नागरिकांकडून पूर्ण पाणीपट्टी आणि त्यावर २४ % व्याज आकारण्याचा नैतिक अधिकार आहे का?" असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. शहरातील विविध सामाजिक संघटना आणि नागरिकांनी पाणीपट्टीवरील व्याज तात्काळ रद्द करून नियमित पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी केली आहे. अन्यथा तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.





> पालिकेकडून तीन ते चार दिवसाआड पाणीपुरवठा करण्यासाठी शर्तीचे प्रयत्न सुरू आहेत. तरी नागरिकांनी पाण्याचा अपव्यय टाळून पाण्याची बचत करून पालिका प्रशासनास सहकार्य करावे.
>
> **– गणेश शिंदे, मुख्याधिकारी, नगर परिषद, अमळनेर**

# भारताच्या मदतीला व्हेनेझुएला येणे शक्य; इंधनाची चिंता होणार दूर!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



इराण आणि अमेरिकेतील संघर्षानंतर होर्मुझ स्ट्रेटमधील वाहतूक संकटात सापडली आहे. त्यामुळे जगात इंधनाची टंचाई सुरु झाली आहे. त्यातच दक्षिण अमेरिकन देश व्हेनेझुएला भारतासाठी मोठा मदतगार बनून पुढे येऊ शकतो. भारताला कच्चे तेल हाच तोच देश आहे, जो गेल्या अनेक वर्षांपासून बिघडती आर्थिक स्थिती, चुकीचे मॅनेजमेंट आणि कठोर आंतरराष्ट्रीय निर्बंधांमुळे अडचणीत आला होता.

परंतू अचानक हा देश आता भारतासहीत जगाच्या एनर्जी सिक्युरिटीसाठी सर्वात महत्वाचा सेंटर बनला आहे. कच्च्या तेलाच्या खेळात या व्हेनेझुएलाच्या परतण्याने आता नवा आशावाद व्यक्त होत आहे की जगभरातील इंधनाचे दर कमी होऊ शकतात. पुरवण्याच्या बाबतीत आता व्हेनेझुएला आता तिसऱ्या क्रमांकावर पोहचला आहे.याबाबतीत त्याने सौदी अरब आणि अमेरिका सारख्या मोठ्या देशांना देखील मागे टाकले आहे.

कच्चे तेल (क्रूड ऑईल)च्या शिवाय जगाची चाके फिरु शकत नाही. सर्वात मोठ्या तेल साठ्याचा विषय जेव्हा येतो तेव्हा मनात सहज सौदी अरब वा अमेरिकेचे नाव समोर येते. परंतू खरा हुकूमी एक्का व्हेनेझुएला आहे. या देशाच्या जमीनीच्या पोटात सुमारे ३०३ अब्ज बॅरल कच्च्या तेलाचा विशाल साठा लपला आहे. हा संपूर्ण जगातील तेल साठ्याचा २० टक्के आहे. अमेरिकेजवळ जितके तेल आहे, त्याच्या पाच पट तेल एकट्या व्हेनेझुएलाकडे आहे.

सौदी अरब (२६७ अब्ज बॅरल)पासून ते कॅनडा (१७१ अब्ज बॅरल)या बाबतीत खूपच मागे आहेत.वर्षानुवर्षे खराब मॅनेजमेंट, जागतिक निर्बंधामुळे हा खजाना जमीनीच पडून आहे. साल २०२० मध्ये याचे उत्पादन घसरुन ४ लाख बॅरल प्रतिदिनाहूनही खाली गेले होते. परंतू आता स्थिती बदलत आहे. ओपेकच्या मे २०२६ च्या रिपोर्टनुसार अमेरिकेच्या बंदीनंतर मिळालेली निवडक सूट, शेव्हरॉन सारख्या ग्लोबल कंपन्यांनी केलेल्या गुंतवणूकीच्या बळावर या देशाचे तेल उत्पादन ११.३६ लाख बॅरल प्रतिदिन पोहचले आहे.

जर या देशाने त्याची संपूर्ण क्षमता वापरली तर आंतरराष्ट्रीय बाजारातील पेट्रोल आणि डिझेलच्या किंमती वेगाने स्थिर होऊ शकतील.भारत आपल्या गरजेच्या सुमारे ८५ टक्के कच्चे तेल परदेशातून आयात करतो. अलिकडील दिवसातील इराण युद्ध, 'स्ट्रेट ऑफ हॉर्मुझ' मध्ये व्यावसायिक जहाजांची येजा बाधित झाल्याने मध्य पूर्वेतून येणारा पुरवठा साखळी वाईटरित्या प्रभावित झाली आहे. यामुळे सौदी अरबहून होणारा पुरवठा घसरुन ३.४० लाख बॅरल प्रतिदिन झाला आहे. या कठीण काळात भारतीय रिफायनरींनी वेगाने आपला दिशा व्हेनेझुएलाकडे केली आहे.

(पान २ वर)

# ट्रकमालकांचा डिझेलसाठी 'एल्गार'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरामध्ये एकमेव विप्रो लिमिटेड साबण फॅक्टरी आहे. तिथून रोज तीस चाळीस ट्रक साबण भरून गाड्या निघत असतात. त्याचप्रमाणे मार्केटला सुद्धा रोज मका, ज्वारी व बाजरी यांच्या ४०-५० गाड्या भरून निघत असतात. परंतु आठ दहा दिवसापासून या गाडीवाल्यांना वेळेवर डिझेल मिळत नाही. डिझेलसाठी एक दोन दिवस उभे राहावे लागते. पंपावर डिझेल आले की त्याच्या अगोदर डिझेल घेणाऱ्यांच्या रांगा असतात. नंबर लागतो तोपर्यंत डिझेल संपून जाते.

रोज शेतकरी ट्रक मालक लाईन मध्ये डिझेल घेण्यासाठी उभे असतात. परंतु सर्वांच्या असे लक्षात आले आहे की एकही डंपर डिझेल घेण्यासाठी लाईन मध्ये उभा नाही तरी रोज अमळनेर मधून हीच डंपर रेती भरून जात असतात. हा भेदभाव कशासाठी? यासाठी ट्रान्सपोर्ट असोसिएशनचे अध्यक्ष श्री सुभाष चौधरी यांच्या नेतृत्वाखाली प्रांताधिकारी मयूर भंगाळे व तहसीलदार रुपेशकुमार सुराणा यांना निवेदन देण्यात आले.

त्यांच्यासोबत अमळनेर ट्रान्सपोर्टचे गोविंदभाई दलाल, बिस्मिल्ला खान पठाण, जगन्नाथ वामनराव पाटील, रुकनुद्दीन इकबाल, शांताराम काशिनाथ सातपुते, इकबाल खान,इब्राहिम खान इत्यादी ड्रायव्हर ट्रक मालक हजर होते. तसेच प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांना डिझेल मिळावे याकरिता विनंती केली आहे.



*अमळनेर : ट्रान्सपोर्ट असोसिएशनचे अध्यक्ष श्री सुभाष चौधरी यांच्या नेतृत्वाखाली प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांना निवेदन देताना गोविंदभाई दलाल, बिस्मिल्ला खान पठाण आदी.*

# जैवविविधता समित्या नावालाच!

## पर्यावरण संवर्धनाकडे स्थानिक स्वराज्य संस्थांचे दुर्लक्ष















**जैवविविधता व्यवस्थापन समिती स्थापन करणे बंधनकारक**

> जैवविविधता अधिनियम २००२ नुसार कलम ४१ अंतर्गत प्रत्येक ग्रामीण भागातील ग्रामपंचायत तसेच शहरी भागातील नगरपंचायत, नगरपालिका आणि महानगरपालिका स्तरावर जैवविविधता व्यवस्थापन समिती स्थापन करणे बंधनकारक आहे. या समित्यांमार्फत जैवविविधतेचे संवर्धन, शाश्वत वापर आणि दस्तऐवजीकरण केले जाते. अधिवासांचे संरक्षण, स्थानिक वाण, पाळीव प्राणी, जलाशयांतील सजीव तसेच पारंपरिक ज्ञानाची नोंद ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यामुळे जैवसंपत्तीचे संवर्धन, जैविक संसाधनांचा शाश्वत उपयोग आणि त्यापासून मिळणाऱ्या फायद्यांमध्ये स्थानिकांना योग्य हिस्सा मिळण्याचे उद्दिष्ट साध्य होऊ शकते.
>
> **– रूपाली सावंत, विभागीय वन अधिकारी**
> **महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ, नागपूर.**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ, नागपूर यांच्या अखत्यारीतील २८ हजार ६४९ जैवविविधता व्यवस्थापन समित्यांपैकी अनेक ग्रामपंचायती, नगरपालिका आणि महानगरपालिकांमध्ये जैवविविधता अधिनियम २००२ च्या नियमांची उघडपणे पायमल्ली होत असल्याचे समोर आले आहे.कायद्यानुसार प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये जैवविविधता व्यवस्थापन समिती स्थापन करणे बंधनकारक असताना अनेक ठिकाणी समित्याच अस्तित्वात नसल्याची धक्कादायक माहिती पुढे येत आहे.

ज्या ठिकाणी समित्या स्थापन आहेत, त्या ठिकाणीही बैठका, नोंदी आणि संवर्धन उपक्रम पूर्णपणे ठप्प असल्याची चर्चा आहे. तालुक्यातील गावे, शहर किंवा परिसरातील वनस्पती, औषधी झाडे, स्थानिक बियाणे, पक्षी, प्राणी, जलस्रोत आणि पारंपरिक ज्ञान यांची माहिती असलेले 'पीपल्स बायोडायव्हर्सिटी रजिस्टर' तयार करून ते नियमित अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. मात्र अनेक ठिकाणी हे नोंदवही अपूर्ण, धूळ खात पडलेले किंवा अस्तित्वातच नसल्याचे चित्र दिसून येत आहे. पर्यावरण संवर्धनासाठी शासनाकडून वारंवार सूचना, प्रशिक्षण तसेच पंधराव्या वित्त आयोगातून निधी उपलब्ध करूनही स्थानिक प्रशासनाकडून गंभीर दुर्लक्ष होत असल्याचा आरोप पर्यावरणप्रेमींनी केला आहे. गेल्या काही वर्षांत वाढती वृक्षतोड, जलप्रदूषण, नष्ट होत चाललेले तलाव, कमी होत चाललेल्या पक्षी व वनस्पतींच्या प्रजाती, प्लास्टिक कचऱ्याचा वाढता विळखा आणि बेकायदेशीर नैसर्गिक साधनसंपत्ती उपसा यामुळे पर्यावरणीय संकट अधिक गडद होत आहे.

मात्र अशा गंभीर परिस्थितीतही अनेक स्थानिक स्वराज्य संस्था जैवविविधता दिन साजरा करताना देखील दिसत नसल्याची खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे तालुक्यात कोणतेही जनजागृती कार्यक्रम, वृक्षारोपण मोहिमा, ग्रामसभा किंवा पर्यावरण अभियान राबवले जात नसल्याचे सांगितले जात आहे. महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे माजी वरिष्ठ अधिकारी व पर्यावरण अभ्यासकांच्या मते, जैवविविधता व्यवस्थापन समिती आणि पीपल्स बायोडायव्हर्सिटी रजिस्टर या केवळ कागदी प्रक्रिया नसून गावातील नैसर्गिक संपत्तीचे अधिकृत दस्तऐवजीकरण आहे. भविष्यात औषधी वनस्पती, पारंपरिक बियाणे आणि स्थानिक ज्ञानावर हक्क सिद्ध करण्यासाठी या नोंदी अत्यंत महत्त्वाच्या ठरणार आहेत.

मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उदासीनतेमुळे जैवसंपत्तीचे मोठे नुकसान होण्याचा धोका वाढत आहे.

(पान २ वर)

# आज शिवसेनेची एसआयआर आढावा बैठक व सत्कार सोहळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शिवसेना मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या आदेशाने तसेच शिवसेना संसदीय गटनेते डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांच्या सूचनेनुसार, जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री ना. गुलाबरावजी पाटील साहेब व जळगाव लोकसभा संपर्कप्रमुख आ. दिलीप मामा लांडे यांच्या मार्गदर्शनाखाली आज शिवसेनेच्या वतीने एसआयआर आढावा बैठक व सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. मा. आ. शिरीषदादा चौधरी यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास आ. अमोलदादा पाटील यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

जिल्हाप्रमुख वासुदेवजी पाटील, जिल्हाप्रमुख विष्णुभाऊ भंगाळे, उत्तर महाराष्ट्र महिला आघाडी प्रमुख सरितताई माळी, ॲड. ललिता ताई पाटील, नगराध्यक्ष डॉ. परिक्षीत बाविस्कर आणि जिल्हाप्रमुख रोहित कोगटा यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.हा कार्यक्रम रविवार दि. २४ मे २०२६ रोजी सायंकाळी ६:०० वाजता इंदिरा गांधी भवन, अमळनेर येथे संपन्न होणार आहे.तालुक्यातील शिवसेना, युवासेना व महिला आघाडीचे सर्व पदाधिकारी, आजी-माजी नगरसेवक, सरपंच, सदस्य, कार्यकर्ते व शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन तालुकाप्रमुख गुलाब पाटील यांनी केले आहे.

अभीष्टचिंतन





प्रा. डॉ. लीलाधर पाटील
प्राचार्य, ख्यातनाम वक्ते



ॲड. श्री. विवेक लाठी
अमळनेर



श्री. जितेंद्र भामरे (पिंटू शेठ)
ज्वेलर्स, अमळनेर



श्री. मितेश गोसालिया
धान्य व्यापारी, अमळनेर



श्री. राजेंद्र पाटील
अमळनेर

गर्व से कहो स्वदेशी है हम...!
स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदे शीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!

जय भारत...!

जय स्वदेशी...!!

अभीष्टचिंतन



श्री. जितेंद्र भामरे
(पिंटू शेठ)
माजी अध्यक्ष - अहिर सुवर्णकार समाज
माजी उपाध्यक्ष - दि सोनार सराफ असोसिएशन
(प्रॉपर्टी डेव्हलपर्स)

यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा...

अमृत ज्वेलर्स
जैन मंदिराशेजारी, सराफ बाजार, अमळनेर

शुभेच्छुक
मित्र परिवार व हितचिंतक

# संपादकीय

## एल निनो व हवामान बदलाच्या धोक्याचा सामना

**सध्या भारताचा एक मोठा भूभाग जणू काही भट्टीत सापडल्यासारखा धगधगत आहे. उत्तर ते मध्य भारतापर्यंतच्या बहुतांश शहरांमध्ये सरासरी तापमान सामान्यपेक्षा ३ ते ५ अंश सेल्सिअसने अधिक नोंदवले जात आहे. हवामानातील हा तीव्र बदल केवळ तात्पुरता नसून, `एल निनो` (El Nio) आणि जागतिक हवामान बदलाचा हा एक संयुक्त व अत्यंत चिंताजनक परिणाम आहे. या बदलत्या हवामानामुळे आगामी काळात परिस्थिती अधिक बिकट होण्याची चिन्हे आहेत.उष्णतेच्या लाटेची भीषण आकडेवारी विविध आंतरराष्ट्रीय अहवालांवर नजर टाकल्यास या संकटाची भीषणता स्पष्ट होते. या हंगामात २७ एप्रिल आणि १९ मे हे दोन दिवस असे होते, जेव्हा जगातील ५० सर्वात उष्ण शहरे एकट्या भारतात होती.**

**जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, भारतातील ५०% पेक्षा जास्त शहरांमध्ये तीव्र उष्णतेचा धोका ‘उच्च’ ते ‘अति उच्च’ पातळीवर पोहोचला आहे.२०१५ ते २०२० या अवघ्या पाच वर्षांत, उष्णतेच्या लाटेच्या दिवसांची वार्षिक सरासरी ७.४ वरून थेट ३२.२ दिवसांवर पोहोचली आहे.चिंतेची बाब म्हणजे आता केवळ दिवसच भाजून काढत नाहीत, तर रात्रीही सुसह्य राहिलेल्या नाहीत. नुकतीच दिल्लीमध्ये मे महिन्यातील गेल्या १३ वर्षांतील सर्वात उष्ण रात्रीची नोंद झाली, जिथे किमान तापमान सामान्यपेक्षा ५.२ अंश सेल्सिअसने जास्त होते.शहरांमधील घटती हिरवळ, सिमेंट–काँक्रीटचे वाढते जाळे आणि प्रदूषण यामुळे शहरे आता `अर्बन हीट आयलंड` बनत आहेत. ही काँक्रीटची जंगले दिवसा उष्णता शोषून घेतात आणि रात्री ती बाहेर टाकतात, ज्यामुळे रात्रीचे तापमानही खाली येत नाही.या वाढत्या उष्णतेचा थेट फटका मानवी आरोग्याला बसत आहे. राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्राच्या आकडेवारीनुसार, २०२५ मध्ये उष्माघाताची ७,००० हून अधिक संशयित प्रकरणे नोंदवली गेली. परंतु, तज्ज्ञांच्या मते भारतातील उष्माघात आणि त्यामुळे होणाऱ्या मृत्यूंची खरी संख्या यापेक्षा खूप जास्त आहे, जी अधिकृतपणे नोंदवली जात नाही.हवामान बदलाचा हा दुहेरी फटका देशाच्या आरोग्य आणि अर्थव्यवस्थेवर होत आहे. या उष्णतेचा सर्वाधिक त्रास समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि उघड्यावर काम करणाऱ्या घटकांना होतोः गिग वर्कर्स (डिलिव्हरी बॉईज), रोजंदारी मजूर, बांधकाम कामगार आणि रस्त्यावरील विक्रेते. हे लोक पोटासाठी घरात बसून राहू शकत नाहीत, त्यामुळे त्यांना थेट उन्हाचा सामना करावा लागतो.तीव्र उष्णतेमुळे कामगारांची कार्यक्षमता मंदावते, कामाचे तास कमी होतात आणि पर्यायाने उत्पादकता घटते.**

**मॅकिन्से ग्लोबल इन्स्टिट्यूट`च्या धक्कादायक अंदाजानुसार, जर उष्णतेची हीच स्थिती कायम राहिली, तर २०३० पर्यंत भारताच्या एकूण जीडीपीच्या (GDP) ४.५% भागाला या उष्णतेचा फटका बसेल.तातडीने करायच्या उपाययोजना या गंभीर संकटाचा सामना करण्यासाठी प्रशासकीय आणि सामाजिक पातळीवर तातडीने पावले उचलणे गरजेचे आहे:उन्हाचा कडाका जास्त असलेल्या दुपारी १२ ते ४ या वेळेत मजुरांना विश्रांती देऊन, कामाच्या वेळा सकाळी लवकर किंवा संध्याकाळी उशिरा अशा बदलण्यात याव्यात. प्रत्येक शहरात फिरत्या नागरिकांसाठी आणि मजुरांसाठी `कूलिंग सेंटर्स` (थंड सावलीचे ठिकाण) आणि पिण्याच्या पाण्याची पुरेशी व्यवस्था करावी. शहरांचे तापमान कमी करण्यासाठी `मियावाकी` पद्धतीसारख्या वननिर्मितीचा वापर करून हिरवळ वाढवणे आवश्यक आहे.`हीट ॲक्शन प्लॅन`ची प्रभावी अंमलबजावणी प्रत्येक राज्याने आणि महानगरपालिकेने हवामान खात्याच्या इशाऱ्यानुसार स्थानिक पातळीवर आपत्ती व्यवस्थापन सक्रिय करणे गरजेचे आहे.हवामान बदलामुळे येणारा काळ अधिक आव्हानात्मक असणार आहे, हे या आकडेवारीवरून स्पष्ट होते. एल निनोसारख्या नैसर्गिक घटकांवर आपले नियंत्रण नसले, तरी आगाऊ नियोजन, योग्य पायाभूत सुविधा आणि निसर्गाचे संवर्धन करून आपण या संकटाची तीव्रता नक्कीच कमी करू शकतो. आता केवळ चर्चा न करता, `क्लायमेट ॲक्शन` घेण्याची हीच योग्य वेळ आहे.**

# चक्क मृतदेहांमध्ये लपल्याने वाचले नंतर मात्र ब्रिटिशांविरुद्ध जीवंत भूत बनले

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

उधम सिंह यांच्या आयुष्यातला असा अध्याय जो फार कमी लोकांना माहिती आहे. बैसाखीचा दिवस लोक आनंदात होते. काही सभा ऐकायला आले होते. काही फक्त कुटुंबासोबत बाहेर पडले होते.जालियनवाला बाग हळूहळू भरत होती.

मग एका अरुंद गेटमधून ब्रिटिश सैनिक आत आले.जनरल डायरने एकच आदेश दिला. “फायर”ना वार्निंग. ना दया. ना पळण्यासाठी जागा. गोळ्या सुरू झाल्या. लोक किंचाळू लागले.आई मुलांना झाकत होती.माणसे विहिरीत उड्या मारत होती.आणि त्या नरकात एक तरुण मुलगा सगळे पाहत उभा होता.



त्यांचे नाव उधम सिंह. इतिहासात आपण वाचतो की त्यांनी नंतर बदला घेतला.पण फार कमी लोकांना माहित आहे. त्या दिवशी ते स्वतः मृतदेहांच्या ढिगाऱ्याखाली अडकून वाचले होते. रात्र झाली तरी बागेत ओरड ऐकू येत होती. ब्रिटिशांनी मदत करू दिली नाही. जखमी लोक तडफडत पडले होते. उधम सिंह हलू शकत नव्हता. त्याच्या अंगावर रक्त होते. शेजारी मृतदेह. गोळ्यांचा वास आणि कानात अजूनही किंचाळ्या.

काही वार्तानुसार तो पूर्ण रात्र तिथेच पडून राहिला. कल्पना करा एक तरुण मुलाभोवती शेकडो मृतदेह आणि डोक्यात एकच आग. “हे विसरणार नाही.” त्या रात्रीनंतर ते बदलले. ते फक्त माणूस राहिले नाही तर ते चालता फिरता बदला बनले. पुढची अनेक वर्ष ते शांत राहिले. लोकांना वाटले सगळे संपले. पण काही लोक बाहेरून शांत असतात. आत मात्र ज्वालामुखी जिवंत असतो. उधम सिंह यांनी देशाबाहेर प्रवास केला. गुप्त संपर्क वाढवले. नवीन नावे वापरली. आणि तब्बल २१ वर्षांनी लंडनमध्ये एका सभागृहात मायकल ओयर भाषण देत उभा होता.

पंजाबचा तोच माजी अधिकारी ज्याच्यावर जालियनवाला हत्याकांडाला पाठिंबा दिल्याचा आरोप होता. लोक शांत बसले होते आणि अचानक धाड! गोळी झाडली गेली. सभागृहात शांतता पसरली. उधम सिंह पळाले नाही. ते उभेच राहिले. कारण त्यांच्यासाठी हा मर्डर नव्हता. त्याच्या डोक्यात अजूनही साल १९१९ च्या किंचाळ्या जिवंत होत्या.जेव्हा त्यांना पकडले गेले. तेव्हा ते घाबरलेले नव्हते. उलट काही वार्तांकन सांगतात. ते शांत होते. जणू एखादे अधुरे वाक्य पूर्ण झाले होते. आजकाल सामाजिक माध्यमांवर जालियनवाला बागचे ए आय रिसॉर्टेड आणि अभिलेखागार पुन्हा पसरवले जात आहेत.

लोकांना कळायला लागले आहे की ही फक्त “इतिहासातील घटना” नव्हती. ही अशी जखम होती ज्यातून काही लोक पूर्ण आयुष्य पेटत राहिले. आणि त्या जखमेतून उठलेले सर्वात भयानक नाव होते. उधम सिंह हे एक असे माणूस जे मृतदेहांमध्ये पडून वाचले आणि नंतर ब्रिटिश साम्राज्याच्या आठवणीत कायमचा काटा बनले.

# महाराष्ट्र वाणिज्य, उद्योग व कृषी महासंघाच्या उपाध्यक्षपदासाठी वेदांशू पाटील यांची उमेदवारी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : महाराष्ट्र वाणिज्य, उद्योग व कृषी महासंघाच्या २०२६–२८ या द्विवार्षिक निवडणूक प्रक्रियेत उत्तर महाराष्ट्र २ विभागातून युवा उद्योजक वेदांशू पाटील यांनी उपाध्यक्ष पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. अमळनेरच्या सुपुत्र असलेल्या वेदांशू पाटील यांच्या उमेदवारीमुळे उत्तर महाराष्ट्रातील उद्योग व व्यापारी क्षेत्रात विशेष उत्सुकता निर्माण झाली आहे. महासंघाचे माजी अध्यक्ष खुशालभाई पोतदार यांच्या उपस्थितीत त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.




*अमळनेर : महाराष्ट्र वाणिज्य, उद्योग व कृषी महासंघाच्या उत्तर महाराष्ट्र २ विभागातून वेदांशू पाटील उपाध्यक्ष पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करतांना.*

यावेळी महासंघातील अनेक ज्येष्ठ पदाधिकारी, उद्योजक व व्यापारी बांधव उपस्थित होते. गेल्या जवळपास नऊ वर्षांपासून महाराष्ट्र वाणिज्य, उद्योग व कृषी महासंघाच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत असलेल्या वेदांशू पाटील यांनी उद्योग, ई–वाणिज्य, शासकीय कंत्राटे, बांधकाम तसेच नव्या पिढीच्या उद्योजकतेशी संबंधित क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

सध्या मनोरंजन क्षेत्रातील काही महत्त्वाकांक्षी प्रकल्पांवरही त्यांचे काम सुरू आहे. महासंघाच्या शंभर वर्षांच्या इतिहासात सर्वात तरुण प्रशासकीय मंडळ सदस्य म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली असून, उपाध्यक्षपदी निवड झाल्यास ते महाराष्ट्रातील सर्वात तरुण उपाध्यक्ष ठरणार असल्याची चर्चा आहे.

अध्यक्ष रविंद्र माणगावे, माजी अध्यक्ष संतोष मंडलेचा, विश्वस्त मंडळ अध्यक्ष आशिष पेडणेकर तसेच वरिष्ठ नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली वेदांशू पाटील यांनी गेल्या काही वर्षांत महासंघाच्या संघटनात्मक व उद्योजकता विकास उपक्रमांमध्ये सक्रिय भूमिका बजावली आहे. विशेष म्हणजे अध्यक्ष रविंद्र माणगावे यांच्या संकल्पनेतील “गाव तिथे उद्योजक” या महत्त्वाकांक्षी अभियानाशी वेदांशू पाटील यांचे नाव सक्रियपणे जोडले गेले आहे.

उपाध्यक्षपदाची संधी मिळाल्यानंतर उत्तर महाराष्ट्रातील प्रत्येक तालुका स्तरावर या अभियानाला गती देत ग्रामीण भागातील युवकांना उद्योग, व्यवसाय व उद्योजकतेच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा त्यांचा मानस आहे.उत्तर महाराष्ट्रात नवीन औद्योगिक वसाहती, नव्या उद्योग संधी, स्थानिक स्तरावर रोजगार निर्मिती तसेच युवकांना उद्योजक बनविण्यासाठी महासंघाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

# नशेसाठी पैसे देण्यास नकार; पतीकडून गुप्तीने वार; गुन्हा दाखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : घरगुती हिंसाचाराच्या वेगवेगळ्या घटना सतत घडत असतात. नशा करण्यासाठी पैसे दिले नाहीत म्हणून पत्नीच्या पाठीत गुप्तीने वार केल्याची घटना तालुक्यातील धार येथे दि. १८ रोजी रात्री साडेनऊ वाजेच्या सुमारास घडली.

याप्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखव करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली अधिक माहिती अशी की, तालुक्यातील धार येथील तेजश्री राहुल भिल (वय २०) हिचे पती राहुल रोहिदास भिल (रा. धार) याच्याशी सतत वाद सुरू होते. राहुल हा पत्नीला “तू माझी पत्नी नाही” असे म्हणून वारंवार हिणवत असल्याने तेजश्री हिने न्यायालयात दावा दाखल केला होता.

दि. १८ रोजी तेजश्री घरी असताना राहुल घरी आला व नशा करण्यासाठी पैसे मागू लागला. मात्र पत्नीने पैसे देण्यास नकार दिल्याने संतापलेल्या राहुलने तिच्या पाठीत गुप्तीने वार केला. त्यावेळी राहुलच्या काकांनी मध्यस्थी करत भांडण सोडविले व त्याला तेथून घेऊन गेले.जखमी अवस्थेत तेजश्री हिने रात्र काढली. दि. २० रोजी ती आपल्या आईसोबत उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात गेली. तेथे तिच्या जखमेवर दोन टाके घालण्यात आले.

त्यानंतर पोलिसांनी जबाब नोंदवून घेतला. याप्रकरणी मारवड पोलीस ठाण्यात राहुल रोहिदास भिल याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक उपनिरीक्षक संजय पाटील करीत आहेत.

# जैवविविधता समित्या नावालाच!

पान १ वरून...

तालुक्यात २०२०–२१ मध्ये ११९ ग्रामपंचायती आणि एका नगरपरिषदेत समित्या स्थापन करण्यात आल्या होत्या. मात्र त्या केवळ कागदोपत्रीच असल्याचे बोलले जात आहे. पंचायत समिती आणि नगरपरिषद प्रशासनातील अनेक अधिकारी जैवविविधता अधिनियम २००२ बाबत अनभिज्ञ असल्याने आजपर्यंत सदस्यांना प्रशिक्षण देण्यात आलेले नाही. बैठकींचे इतिवृत्त नाही, जैवविविधता निधीचा वापर नाही आणि ग्रामसभांमध्ये पर्यावरण विषयांवर चर्चाही होत नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे स्थानिक जैवविविधता निधी, जैविक संसाधनांच्या वापरातून मिळणाऱ्या फायद्यांचे वाटप आणि विविध पर्यावरण योजनांमधून मिळणाऱ्या आर्थिक मदतीपासून अनेक गावे वंचित राहत असल्याचेही सांगितले जात आहे. दरम्यान, पर्यावरण कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच नगरविकास विभागाने राज्यभर विशेष मोहीम राबवून जैवविविधता व्यवस्थापन समित्यांचे अस्तित्व, पीपल्स बायोडायव्हर्सिटी रजिस्टरची स्थिती आणि जैवविविधता निधीची तपासणी करावी, अशी मागणी केली आहे.

नियमांचे पालन न करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांवर कारवाई करावी तसेच जबाबदार अधिकाऱ्यांची उत्तरदायित्व निश्चित करावे, अशी मागणीही जोर धरत आहे. पर्यावरण संवर्धन केवळ घोषणांपुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष कृतीत दिसले पाहिजे. अन्यथा भविष्यातील पिढ्यांना नैसर्गिक संपत्तीपासून वंचित राहण्याची वेळ येईल, अशी तीव्र प्रतिक्रिया नागरिक आणि पर्यावरणप्रेमींमधून व्यक्त होत आहे.

# भारताच्या मदतीला सर्वात मोठा तेलसाठा असलेला देश, इंधनाची नो चिंता!

पान १ वरून...

व्हेनेझुएला त्याच्या ११.३६ लाख बॅरलच्या उत्पादनापैकी ४ लाख बॅरल तेल स्वतःवापरतो. उर्वरित ७.३ लाख बॅरलच्या निर्यातीपैकी भारत एकटा ४.१७ लाख बॅरल (मे महिन्याचा डेटा) खरेदी करत आहे. याचा अर्थ व्हेनेझुएलाच्या एकूण निर्यातीच्या ५५ टयांहून जास्त हिस्सा थेट भारतीय बंदरात उतरत आहे. कधी काळी चीन या देशाचा सर्वात मोठा खरेदीदार होता, परंतू चीनच्या सुस्तीचा फायदा रिलायन्स , नयारा सारख्या भारतीय कंपन्यांनी उचलला आहे. या रिफायनरी व्हेनेझुएलाच्या जड क्रुड तेलावर प्रक्रीया करण्यात जगात सर्वात माहिर आहेत.भारताचा डाव केवळ स्वस्त तेल खरेदीपर्यंत मर्यादित नाही. हा धोरणात्मक सुरक्षेचाही मोठा भाग आहे.भारताची सरकारी पेट्रोलियम कंपनी ओएनजीसीने या देशाच्या ऑईल ब्लॉक्समध्ये कोट्यवधी डॉलरची मोठी रक्कम गुंतवलेली आहे. दीर्घकालीन अस्थिरतेने हा पैसा अडकलेला होता. आता हळूहळू येथील परिस्थिती सुधारत असल्याने भारताच्या गुंतवणूकीच्या सुरक्षेची गॅरंटी मजबूत झाली आहे.जगभरातील देश इंधनाच्या टंचाईने बेजार झाले आहे. भारताने आपले धोरण स्पष्ट केले आहे. भारत ऊर्जेसाठी कोणत्याही एका देशावर अवलंबून राहणार नाही. मे महिन्यात भारताची एकूण तेल आयात ८ टयांनी वाढून ४९ लाख बॅरल प्रतिदिन पोहचली आहे. भारताने रशियाकडून सर्वाधिक १९.८३ लाख बॅरल कच्चे तेल खरेदी केले आहे. तर दुसऱ्या बाजूला युएईला दुसऱ्या नंबरवर ठेवले आहे.आता व्हेनेझुएला मजबूतीने तिसऱ्या क्रमांकावर उभा आहे.

# किवी खाण्याचे ‘हे’ थक्क करणारे फायदे तुम्हाला माहिती आहेत का?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



किवीमधील व्हिटॅमिन सी रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यास मदत करते. यातील अँटीऑक्सिडंट्स पेशींच्या नुकसानापासून रक्षण करण्यास मदत करतात. किवीमधील फायबरचे प्रमाण पचनक्रिया निरोगी ठेवण्यास मदत करते. आतड्यांचे आरोग्य सुधारू शकते. बद्धकोष्ठतेचा त्रास कमी होऊ शकतो. किवीमध्ये कॅलरीज कमी असल्याने वजन नियंत्रणासाठी हा उत्तम पर्याय ठरतो. यात पोटॅशियम असते, जे रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करते. या फळामध्ये पाण्याचे प्रमाण जास्त असल्याने ते शरीर हायड्रेटेड ठेवण्यास मदत करते. व्हिटॅमिन ई आणि व्हिटॅमिन सी त्वचा निरोगी ठेवण्यास मदत करतात.

# विद्यार्थ्यांच्या शाखा बदलावर बंधने

## आमदार अनिलदादा पाटील यांची शिक्षणमंत्र्यांकडे मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्य शासनाने इयत्ता ११ वी पाठोपाठ २०२६–२७ पासून इयत्ता १२ वीची प्रवेश प्रक्रियाही ऑनलाईन केल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक स्वातंत्र्यावर मर्यादा येत असल्याचा मुद्दा समोर आला आहे. ११ वी विज्ञान शाखेत शिकलेल्या विद्यार्थ्यांना १२ वीमध्ये कला किंवा वाणिज्य शाखेत प्रवेश घेण्याची संधी ऑनलाईन प्रणालीमुळे बंद झाली आहे.



यासंदर्भात अमळनेरचे आमदार व माजी मदत व पुनर्वसन मंत्री अनिलदादा भाईदास पाटील यांनी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांना निवेदन देऊन पूर्वीप्रमाणे शाखा बदलाची मुभा देण्याची मागणी केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, २०२५ पूर्वी ऑफलाईन प्रक्रियेत ११ वी विज्ञाननंतर १२ वीला कला किंवा वाणिज्य शाखेत प्रवेश घेता येत होता. तसेच ११ वी वाणिज्यनंतर १२ वी कला शाखेतही प्रवेशाची सुविधा होती. मात्र, नव्या ऑनलाईन प्रणालीमुळे ही लवचिकता पूर्णतः बंद झाली आहे.

ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी आर्थिक अडचणींमुळे खासगी क्लासेस लावू शकत नाहीत. विज्ञान शाखेचा अभ्यासक्रम झेपत नसल्याने अनेकजण १२ वीला कला किंवा वाणिज्य शाखा निवडू इच्छितात. मात्र ऑनलाईन प्रक्रियेमुळे त्यांच्यासमोर अडथळे निर्माण झाले असून विद्यार्थी नैराश्याच्या गर्तेत जाण्याची भीती आहे, असे पाटील यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी व त्यांच्या भविष्यासाठी पूर्वीप्रमाणे ११ वी विज्ञान शाखेनंतर १२ वी कला किंवा वाणिज्य शाखेत प्रवेश देण्याबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा व शिक्षण विभागाला आवश्यक निर्देश द्यावेत, अशी मागणी त्यांनी केली आहे. शिक्षण क्षेत्रातील जाणकारांच्या मते, विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुसार शाखा निवडण्याचे स्वातंत्र्य अबाधित राहणे आवश्यक असून शासनाने याबाबत लवकरात लवकर निर्णय घेणे गरजेचे आहे अशी अपेक्षा आमदार अनिलदादा पाटील यांनी व्यक्त केली आहे.

# अतिरिक्त तेल सेवन, असंतुलित आहारामुळे भारतीयांचे आरोग्य धोक्यात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पंतप्रधानांनी देशवासियांना तेल कमी खाण्याचे आवाहन केले आहे. यापूर्वीही त्यांनी हा विषय मांडला होता. या विषयाकडे केवळ राजकीय चष्म्यातून किंवा सोशल मीडियावरील रिल्स मधून पाहण्याऐवजी, भारतीय आहाराच्या बदलत्या स्वरूपावर गंभीर चर्चा होणे आवश्यक आहे.



मुळात पारंपरिक भारतीय आहार तुलनेने संतुलित होता. भाकरी–भात, डाळी, कडधान्ये, भाज्या, ताक, दूध, हंगामी फळे, कमी तेलात बनवलेले पदार्थ हा आहार शरीराला आवश्यक पोषण देणारा होता. पण मागील २५–३० वर्षांत शहरीकरण, फास्ट फूड, प्रक्रिया केलेले पदार्थ, जास्त तळलेले पदार्थ आणि बदलती जीवनशैली यामुळे आहाराचे संतुलन ढासळले.

आज अनेक कुटुंबांमध्ये स्निग्ध पदार्थ (तेल, तूप, तळलेले पदार्थ) वाढले, पण प्रोटीन आणि जीवनसत्त्वयुक्त अन्न तुलनेने कमी झाले. हेच पुढे आरोग्य समस्यांचे एक मोठे कारण ठरत आहे.भारतीय आहारात आवश्यक प्रमाण किती?

**आरोग्य तज्ज्ञांच्या मते :**

**तेल / फॅटचे प्रमाण :** एका व्यक्तीसाठी साधारण २०–२५ ग्राम पुरेसे मानले जाते. अनेक घरांमध्ये हे प्रमाण यापेक्षा खूप जास्त आहे.

**प्रोटीनची गरज :** साधारण प्रौढ व्यक्तीस प्रति किलो वजनामागे ०.८ ते १ ग्रॅम प्रोटीन आवश्यक असते. म्हणजे ६० किलो वजनाच्या व्यक्तीस दिवसाला अंदाजे ४८ ते ६० ग्रॅम प्रोटीन गरजेचे असते. डाळी, हरभरा, मूग, अंडी, दूध, दही, पनीर, मासे, कडधान्ये हे त्याचे स्रोत आहेत.

**जीवनसत्त्वे :** हिरव्या भाज्या, फळे, दूध, डाळी, सुका मेवा आणि विविध अन्नघटकातून शरीराला आवश्यक जीवनसत्त्वे मिळतात. पण आज प्रक्रिया केलेले आणि तळलेले अन्न वाढल्याने यांची कमतरता दिसून येते. याचा परिणाम काय ?भारतामध्ये मधुमेह, लठ्ठपणा, रक्तदाब आणि हृदयविकार झपाट्याने वाढताना दिसतात. भारतात हृदयविकाराचे प्रमाण चिंतेचा विषय मानले जाते. केवळ औषधे नव्हे, तर आहारातील बदल हा मोठा उपाय आहे. एकेकाळी भारत खाद्यतेलात जवळपास स्वयंपूर्ण होता. आज देश मोठ्या प्रमाणात खाद्यतेल आयात करतो आणि यावर मोठे परकीय चलन खर्च होते. त्यामुळे तेलाचा विवेकी वापर हा फक्त आरोग्याचा नव्हे तर आर्थिक प्रश्नही आहे.लहानपणी आपल्या घरात किती तेल वापरले जायचे, हे आई–वडिलांना विचारा. बहुतेक वेळा उत्तर असे मिळेल की पदार्थ साधे असायचे, पण शरीराने लोक अधिक सक्षम होते. कारण अन्नात संतुलन होते.याचा अर्थ तेल पूर्ण बंद करणे नव्हे; तर आवश्यक तेवढेच तेल, आणि त्यासोबत पुरेसे प्रोटीन, भाज्या, फळे व संतुलित आहार ही काळाची गरज आहे. राजकारण बाजूला ठेवूया हा विषय आपल्या कुटुंबाच्या आरोग्याचा आहे.“कमी तेल, जास्त संतुलित आहार” हेच भविष्यातील मोठे आरोग्य संरक्षण ठरू शकते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# पति ने दिया धोखा, समाज ने मारे ताने

## बिना इंटरनेट के यूपीएससी क्रैक कर आयआरएस बन गईं कोमल

सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

संघ लोक सेवा आयोग (यूपीएससी) की सिविल सेवा परीक्षा को देश की सबसे कठिन परीक्षाओं में से एक माना जाता है। इस परीक्षा को पास करने के लिए जहां कई छात्र सुख-सुविधाओं के बीच दिन-रात एक कर देते हैं, वहीं कुछ ऐसी भी कहानियां होती हैं जो विपरीत परिस्थितियों को मात देकर लिखी जाती हैं। ऐसी ही एक बेहद प्रेरणादायक कहानी है कोमल गणात्रा की। कोमल ने सामाजिक तानों और सीमित संसाधनों के बावजूद अपने चौथे प्रयास में यूपीएससी परीक्षा क्रैक की और आईआरएस अधिकारी बनीं। कोमल की यह यात्रा किसी फिल्मी कहानी जैसी लगती है, लेकिन इसमें छिपा संघर्ष और उनका हौसला पूरी तरह वास्तविक है, जो देश की लाखों बेटियों के लिए एक मिसाल है।





### पिता की सीख और शुरुआती जीवन

कोमल गणात्रा मूल रूप से गुजरात के अमरेली जिले के सावरकुंडला की रहने वाली हैं। उनका जन्म साल १९८२ में हुआ था। कोमल की शुरुआती स्कूली शिक्षा गुजराती मीडियम से हुई। उनके पिता, जो पेशे से एक शिक्षक थे, उन्होंने कोमल को मात्र ४ साल की उम्र में ही यह सीख दी थी कि उन्हें बड़े होकर आईएएस अधिकारी बनना है। पिता के मार्गदर्शन के कारण कोमल शुरू से ही पढ़ाई में काफी होनहार थीं। उन्होंने अपनी उच्च शिक्षा के दौरान अलग-अलग विश्वविद्यालयों से तीन अलग-अलग भाषाओं में डिग्रियां हासिल कीं। उन्होंने राजकोट गवर्नमेंट पॉलीटेक्निक से इंजीनियरिंग में डिप्लोमा किया, डॉ. बाबासाहेब अंबेडकर ओपन यूनिवर्सिटी से बीए किया और पीटीसी का कोर्स भी पूरा किया।

### शादी के लिए छोड़ा इंटरव्यू और फिर मिला धोखा

साल २००८ में कोमल ने गुजरात लोक सेवा आयोग की मुख्य परीक्षा पास कर ली थी। वह अधिकारी बनने के बेहद करीब थीं, लेकिन उसी दौरान उनकी शादी एक एनआरआई से तय हो गई। शादी के चलते उन्होंने प्रशासनिक सेवा के इंटरव्यू में शामिल न होने का एक बड़ा फैसला लिया। उन्हें लगा कि शादी के बाद उनकी जिंदगी खुशियों से भर जाएगी। २६ साल की उम्र में उनकी शादी न्यूजीलैंड के एक व्यवसायी से हुई। लेकिन शादी के महज १५ दिनों बाद ही उनकी दुनिया पूरी तरह बदल गई। ससुराल वालों ने दहेज के लिए प्रताड़ित करना शुरू किया और उनके पति शादी के सिर्फ दो हफ्ते बाद ही उन्हें भारत में अकेला छोड़कर विदेश (न्यूजीलैंड) चले गए। कोमल ने अपने स्तर पर पति की तलाश करने और न्याय पाने के लिए सरकारी दफ्तरों के चक्कर काटे, लेकिन उन्हें सिर्फ असफलता हाथ लगी।

### अपनों के ताने और गांव का एकांत सफर

ससुराल से निकाले जाने के बाद कोमल अपने माता-पिता के घर सावरकुंडला लौट आईं। लेकिन यहां भी मुश्किलें कम नहीं हुईं। पड़ोसियों और रिश्तेदारों ने उनके हालात पर हमदर्दी जताने के बजाय उन्हें ताने मारना शुरू कर दिया। जब भी वह बाहर निकलतीं, लोग उनसे उनके पति के बारे में पूछते। इन कड़वी बातों से तंग आकर कोमल ने आत्मसम्मान की रक्षा के लिए अपने गृहनगर से ४० किलोमीटर दूर एक सुदूर गांव में अकेले रहने का फैसला किया। गांव में उन्हें एक प्राथमिक स्कूल में शिक्षिका की नौकरी मिल गई, जहां उनकी मासिक सैलरी केवल ₹५,००० थी। इसी मामूली रकम से गुजारा करते हुए उन्होंने सिस्टम का हिस्सा बनकर बदलाव लाने का संकल्प लिया और दोबारा यूपीएससी की तैयारी शुरू की।

### बिना इंटरनेट और बिना अंग्रेजी अखबार के संघर्ष

वह जिस ग्रामीण इलाके में रह रही थीं, वहां यूपीएससी की तैयारी के लिए कोई सुख-सुविधा मौजूद नहीं थी। गांव में बिजली अक्सर जाती रहती थी, इंटरनेट की कोई व्यवस्था नहीं थी और करेंट अफेयर्स के लिए सबसे जरूरी माना जाने वाला अंग्रेजी का अखबार भी वहां नहीं आता था। कोमल सोमवार से शुक्रवार तक स्कूल में बच्चों को पढ़ाती थीं और शनिवार-रविवार को वह कोचिंग के लिए ३०० किलोमीटर का सफर तय करके अहमदाबाद जाती थीं। इस दौरान उन्होंने स्कूल से कभी छुट्टी नहीं ली। तीन बार उन्हें यूपीएससी में असफलता मिली, लेकिन उनका हौसला नहीं डिगा। चौथे प्रयास (यूपीएससी २०१२) के दौरान उनका एग्जाम सेंटर मुंबई था। वह स्कूल खत्म करके पूरी रात ट्रेन में सफर कर मुंबई पहुंचीं, परीक्षा दी और तुरंत काम पर लौट आईं।

### चौथे प्रयास में हासिल की ५९१ वीं रैंक

कोमल की वर्षों की तपस्या और अटूट संकल्प आखिरकार रंग लाया। यूपीएससी २०१२ की परीक्षा में उन्होंने अखिल भारतीय स्तर पर ५९१ वीं रैंक हासिल की और उनका चयन भारतीय राजस्व सेवा (आयआरएस) के लिए हुआ। कोमल गणात्रा की सफलता केवल एक परीक्षा पास करने की कहानी नहीं है, बल्कि यह कहानी है उस अदम्य साहस की, जो एक महिला को बिखरने के बाद दोबारा उठने और समाज को अपनी सफलता से करारा जवाब देने की ताकत देता है।

# आंबा खाण्यापूर्वी भिजवून का ठेवावा?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदुस्थानात उन्हाळ्यात आंबे अनेक प्रकारे खाल्ले जातात, त्यापैकी सर्वांत सामान्य म्हणजे रात्रीच्या जेवणानंतर खाणे. लोक स्मूदी, कँडी, लोणची, आंब्याचे पापड, आंब्याचे पन्हे, चटण्या आणि भाज्यांचे पदार्थही बनवितात. आंबे भिजवणे का महत्त्वाचे आहे आणि त्याचे फायदे काय आहेत, हे जाणून घेणे खूप महत्त्वाचे आहे. आंब्यामध्ये व्हिटॅमिन सी, ए आणि बी कॉम्प्लेक्स असतात. त्यात फायबर, लोह, सोडियम, कॅल्शियम, पोटॅशियम आणि इतर पोषक तत्वे भरपूर प्रमाणात असतात. फळांचा राजा असलेला आंबा केवळ आपली रोगप्रतिकारशक्तीच सुधारत नाही, तर डोळ्यांसाठीही फायदेशीर मानला जातो. खाण्यापूर्वी आंबा भिजवणे का महत्त्वाचे आहे, हे जाणून घेऊया.



आंबा हे उष्ण फळ आहे आणि उन्हाळ्यात ते जास्त खाल्ल्याने पोट फुगणे किंवा पोटाच्या इतर समस्या उद्भवू शकतात. याव्यतिरिक्त काही लोकांना मुरुमे येतात. आंबे भिजवल्याने शरीरातील उष्णता कमी होते, असे मानले जाते. तज्ज्ञांच्या मते, भिजवल्याने अतिरिक्त फायटिक ॲसिड निघून जाते. यामुळे पोषक तत्वांचे शोषण अधिक चांगल्या प्रकारे होण्यास मदत होते. असे म्हटले जाते की फायटिक ॲसिडमुळे शरीर लोह, जस्त, कॅल्शियम आणि इतर खनिजे शोषून घेऊ शकत नाही, ज्यामुळे खनिजांची कमतरता निर्माण होते. हे ॲसिड शरीरात उष्णता निर्माण करते, म्हणूनच आंबे भिजवले पाहिजेत.

### रोगप्रतिकारशक्ती वाढवते

आंब्यामध्ये व्हिटॅमिन सी असते, जे आपली रोगप्रतिकारशक्ती वाढविण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. त्यात इतरही अनेक पोषक तत्वे असतात, जी आपली रोगप्रतिकारशक्ती मजबूत करण्यास मदत करतात. उन्हाळ्यात रोगप्रतिकारशक्ती मजबूत ठेवण्यासाठी आंबे खाणे उत्तम आहे.

### पचनसंस्थेसाठी फायदे

आंब्यामध्ये फायबर भरपूर प्रमाणात असते. शिवाय, आंब्यामधील पाण्याचे प्रमाण एन्झाइम्स सक्रिय करण्यासाठी प्रभावी ठरते. त्यात अमायलेज असते, जे आतड्यांचे आरोग्य निरोगी ठेवण्यास मदत करते. तथापि, जास्त प्रमाणात आंबे खाल्ल्याने पोट खराब होऊ शकते आणि जुलाबही होऊ शकतात. असे म्हटले जाते की अशा प्रकारे आंबे खाल्ल्याने पोटात उष्णता वाढते, ज्यामुळे पचनसंस्थेच्या योग्य कार्यात अडथळा येतो.

त्वचा आणि केसांसाठी फायदे आंब्यामधील व्हिटॅमिन ए केसांसाठी फायदेशीर आहे. त्यात व्हिटॅमिन सी असते, जे त्वचेला नैसर्गिकरित्या चमकदार बनवते. त्यामुळे हे फळ चवीला स्वादिष्ट असण्यासोबतच आपल्या शरीरासाठी, त्वचेसाठी आणि केसांसाठी देखील फायदेशीर आहे.

# दहा फुटांवरून अचूक निशाणा!

## ‘हा’ साप थेट डोळ्यांत मारतो विषाची पिचकारी!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मोझांबिक स्पिटिंग कोब्रा प्रामुख्याने आफ्रिका खंडातील मोझांबिक, दक्षिण आफ्रिका, आणि टांझानिया या देशांमधील जंगलात व गवताळ भागात आढळतो. हा साप केवळ चावत नाही, तर स्वतःच्या संरक्षणासाठी शत्रूवर लांबूनच विषाची थेट ‘पिचकारी’ मारतो.

हा कोब्रा साधारण २ ते ३ मीटर (६ ते १० फूट) अंतरावरून शत्रूवर विषाचे तुषार उडवू शकतो. त्याचे तोंड बंद असतानाही तो विष फेकण्यात पटाईत असतो. सर्वांत थक्क करणारी गोष्ट म्हणजे, पिचकारी मारताना या सापाचा मुख्य रोख नेहमी समोरच्या जीवाच्या थेट ‘डोळ्यांवर’ असतो आणि त्याचे निशाणे ९० टक्के अचूक असतात.

होय! याचे विष अत्यंत जहाल असते. जर हे विष डोळ्यात गेले आणि तातडीने उपचार मिळाले नाहीत, तर कॉर्निया निकामी होऊन माणूस कायमचा आंधळा होऊ शकतो. विष डोळ्यात गेल्यास प्रचंड वेदना आणि जळजळ होते. अशा वेळी डोळे अजिबात न चोळता ते स्वच्छ पाण्याने सतत धुत राहावे आणि लगेच वैद्यकीय मदत घ्यावी.

जर हा साप चुकून चावला, तर त्याचे सायटोटॉक्सिक विष शरीरातील पेशी आणि त्वचा नष्ट करू लागते. याच्या चावण्यावर तातडीने अँटी-व्हेनम देणे गरजेचे असते. हा रात्रीच्या वेळी जास्त सक्रिय असतो. लहान बेडूक, सरडे, उंदीर, पक्षी आणि इतर लहान साप हे याचे मुख्य अन्न आहे. हा कोब्रा एकापाठोपाठ एक अनेक वेळा विषाची पिचकारी मारू शकतो. आफ्रिकेतील सर्वांत रागीट आणि धोकादायक सापांमध्ये याची गणना होते.



# ‘कॉकरोच जनता पार्टी’चा देशभरात धुमाकूळ

## बॉलिवूड कलाकारांचाही फुल्ल सपोर्ट; फॉलोअर्सच्या यादीत बड्या सेलिब्रिटींची नावे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर जणू क्रांती पाहायला मिळत आहे. अनेक देशांत युवा वर्गाने सोशल मीडियाच्या माध्यमातून मोठा बदल घडवला आहे. आता गेल्या काही दिवसांत एका नावाने सोशल मीडियावर चांगलाच धुमाकूळ घातला आहे. ते नाव म्हणजे ‘कॉकरोच जनता पार्टी’. सध्या देशभरात ‘कॉकरोच जनता पार्टी’ची चर्चा सुरू आहे. या हटके पार्टीला आता बॉलिवूड सेलिब्रिटींनीही पाठिंबा दिला आहे.

‘कॉकरोच जनता पार्टी’ सुरूवातीला केवळ एक उपरोधिक मोहीम म्हणून सुरू झालेल्या या पेजने अवघ्या पाच-सहा दिवसांत सोशल मीडियावर रेकॉर्ड ब्रेक फॉलोअर्स मिळविले आहेत. इंस्टाग्रामवर या पेजच्या फॉलोअर्सची संख्या तब्बल ११ दशलक्ष पार गेली असून, त्यांनी देशातील सत्ताधारी पक्ष असलेल्या भारतीय जनता पार्टीलाही मागे टाकले आहे. विशेष म्हणजे या डिजिटल आंदोलनात आता सर्वसामान्य तरुणांसोबतच बॉलिवूडमधील नामांकित सेलिब्रिटी आणि दिग्दर्शकही सामील झाले आहेत.






### ‘कॉकरोच जनता पार्टी’ला सेलिब्रिटींचा फुल्ल सपोर्ट

‘कॉकरोच जनता पार्टी’ला बॉलिवूड सेलिब्रिटींचा मोठा पाठिंबा मिळताना दिसत आहे. अनेक लोकप्रिय सेलिब्रिटींनी या पेजला फॉलो केले आहे. अभिनेत्री दिया मिर्झा, फातिमा सना शेख, कोंकणा सेन शर्मा, उर्फी जावेद, ईशा गुप्ता हिमांशी खुराना यांनी ‘कॉकरोच जनता पार्टी’ला इन्स्टाग्रामवर फॉलो केले आहे. तर प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक अनुराग कश्यप, स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा यांनीही या पेजला फॉलो केले आहे. तर विशाल डडलानी, उमर रियाज, अभिषेक निगम, नगमा मिराजकर, पूरव झा, रौनक रजानी, शफाक नाज, शीजान खान या सेलिब्रिटींनीही ‘कॉकरोच जनता पार्टी’ला पाठिंबा दिला आहे.

### ‘कॉकरोच जनता पार्टी’बद्दल...

‘कॉकरोच जनता पार्टी’ का सुरू झाली? या प्रश्नाचे उत्तर भारताचे सरन्यायाधीश (सीजीआय) सूर्यकांत यांच्या एका वक्तव्याशी जोडले गेले आहे. भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी एका न्यायालयीन सुनावणीदरम्यान सोशल मीडियावरील काही बेरोजगार तरुणांची तुलना कथितपणे ‘कॉकरोच’ (झुरळ) आणि ‘परजीवी’ यांच्याशी केली होती. यानंतर प्रतिक्रिया उमटल्या. वातावरण तापल्यानंतर सूर्यकांत यांनी स्पष्टीकरणही दिले होते. यानंतर ‘कॉकरोच’ मात्र भलतेच ट्रेंडिंगमध्ये आले. अनेक तरुण मी ‘कॉकरोच’ आहे, असे उपरोधिकपणे सांगू लागले. यातूनच ‘कॉकरोच जनता पार्टी’ तयार झाली.

या मोहिमेची सुरूवात पुण्याचा मूळ रहिवासी आणि सध्या बोस्टन युनिव्हर्सिटीमध्ये जनसंपर्क क्षेत्रात उच्च शिक्षण घेणारा ३० वर्षीय युवक अभिजित दिपके याने केली आहे. त्याने स्वतःला ‘कॉकरोच जनता पार्टी’ या पक्षाचा ‘संस्थापक अध्यक्ष’ घोषित केले आहे.

### कॉकरोच जनता पार्टीचे घोषणापत्र

या पार्टीने आपले घोषणापत्रदी जाहीर केले आहे. ‘घोषणापत्रात’ काही गंभीर मुद्देही उपरोधिकपणे मांडले आहेत. सगळ्यात पहिला मुद्दा म्हणजे सरन्यायाधीशांना निवृत्तीनंतर कोणतीही राज्यसभेची जागा किंवा सरकारी पद मिळू नये. तर असे अनेक मुद्दे यात आहेत.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे. सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरूम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे



# ॥ मंगल पान ॥

## सूर्यदेवाची आरती

ॐ जय सूर्य भगवान, जय हो दिनकर भगवान।
जगत् के नेत्रस्वरूपा, तुम हो त्रिगुण स्वरूपा।
धरत सब ही तव ध्यान, ॐ जय सूर्य भगवान॥
॥ॐ जय सूर्य भगवान...॥
सारथी अरुण हैं प्रभु तुम, श्वेत कमलधारी। तुम चार भुजाधारी॥
अश्व हैं सात तुम्हारे, कोटि किरण पसारे। तुम हो देव महान॥
॥ॐ जय सूर्य भगवान...॥
ऊषाकाल में जब तुम, उदयाचल आते। सब तब दर्शन पाते॥
फैलाते उजियारा, जागता तब जग सारा। करे सब तब गुणगान॥
॥ॐ जय सूर्य भगवान...॥
संध्या में भुवनेश्वर अस्ताचल जाते। गोधन तब घर आते॥
गोधूलि बेला में, हर घर हर आंगन में। हो तव महिमा गान॥
॥ॐ जय सूर्य भगवान...॥
देव-दनुज नर-नारी, ऋषि-मुनिवर भजते। आदित्य हृदय जपते॥
स्तोत्र ये मंगलकारी, इसकी है रचना न्यारी। दे नव जीवनदान॥
॥ॐ जय सूर्य भगवान...॥
तुम हो त्रिकाल रचयिता, तुम जग के आधार। महिमा तब अपरम्पार॥
प्राणों का सिंचन करके भक्तों को अपने देते। बल, बुद्धि और ज्ञान॥
॥ॐ जय सूर्य भगवान...॥
भूचर जलचर खेचर, सबके हों प्राण तुम्हीं। सब जीवों के प्राण तुम्हीं॥
वेद-पुराण बखाने, धर्म सभी तुम्हें माने। तुम ही सर्वशक्तिमान॥
॥ॐ जय सूर्य भगवान...॥
पूजन करतीं दिशाएं, पूजे दश दिक्पाल। तुम भुवनों के प्रतिपाल॥
ऋतुएं तुम्हारी दासी, तुम शाश्वत अविनाशी। शुभकारी अंशुमान॥
॥ॐ जय सूर्य भगवान...॥
ॐ जय सूर्य भगवान, जय हो दिनकर भगवान।
जगत् के नेत्रस्वरूपा, तुम हो त्रिगुण स्वरूपा।स्वरूपा॥
धरत सब ही तव ध्यान, ॐ जय सूर्य भगवान॥

## मना सज्जना... जेथे जातो तेथे देव माझा सांगाती...

परम स्नेही मित्रहो,

आज श्लोक क्र. ३६ चा अर्थ समजावून घेऊ. त्यासोबतच याच आशयाचा श्लोक क्र. १८६ आहे. त्याचाही अर्थ समजावून घेऊ.

**सदा सर्वदा देव सन्नीध आहे ।**
**कृपाळूपणे अल्प धारिष्ट पाहे ।**
**सुखानंद आनंद कैवल्य दानी ।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।। ३६ ।।**

मागील भागात 'भाव तैसा देव' असल्याचे आपण पाहिले. विन्रम प्रार्थना केल्यावर देव भक्ताला सहज पावतो हे निसंशय सत्य असल्याचे समर्थ प्रतिपादन आहे. समर्थ मनाला हळूवार भक्तीच्या वाटेवर घेऊन जात आहेत.

'सदा सर्वदा देव सन्नीध आहे' हे एक आश्वासक आणि धीर देणारे वचन आहे. देव सदैव आपल्या भक्ताच्या संनिध म्हणजे जवळपास आहे. सोबत आहे. अंतरात आहे. परंतु 'तो अल्प धारिष्ट पाहे' असे समर्थ म्हणतात. संकटकाळी देव धावून येतोच; परंतु तो भक्ताची अल्प परीक्षाही पाहतो. भक्ताच्या अंगी असलेले धारिष्ट परीक्षण करतो. त्याची भक्ती बावनकशी आहे का? हे पाहतो आणि त्यानंतर भक्ताच्या हाकेला सत्वर धावून येतो. असा या श्लोकाचा अर्थ.

परंतु या ठिकाणी समर्थांना 'देव' ही संकल्पना नेमकी काय अभिप्रेत आहे? ते आपण पाहूया.

समर्थ नेहमी निर्गुणाची भक्ती सगुणाच्या माध्यमातून करायला सांगतात. त्यासाठी 'देव' म्हणून विशिष्ट देवतेचे पूजन, नामस्मरण करायला सांगतात. त्याच्या या श्लोकात प्रभू श्रीरामचंद्र हे आराध्य दैवत आहे.

परंतु 'देव' म्हणजे नेमके काय? याबाबत समर्थांनी दासबोधाच्या सहाव्या दशकात 'देवशोधन'



नावाचा स्वतंत्र समास लिहिलेला आहे. देवाचे स्वरूप स्पष्ट केले आहे. त्यात ते म्हणतात-

**ब्रह्मा, विष्णू आणि हर । त्यासी निर्मिता तोचि थोर ।**
**तो ओळखावा परमेश्वर । नाना येत्ने ।।**
**तो देव ठाई पडेना । तरी येमयातना चुकेना ।**
**ब्रह्माण्डनायेक चोजवेना । हे बरे नव्हे ।।**
**जेणे संसारी घातले । आवघे ब्रह्माण्ड निर्माण केले ।**
**त्यासी नाही वोळखिले । तोचि पतीत ।।**
**म्हणूनही देव ओळखावा । जन्म सार्थकचि करावा ।**
**न कळे तरी सत्संग धरावा । म्हणिजे कळे ।।**
**जो जाणेल भगवंत । तया नाव बोलिजे संत ।**
**जो शाश्वत आणि अशाश्वत । निवाडा करी ।।**
**चळेना ढळेना देव । ऐसा ज्याचा अंतर्भाव ।**
**तोची जाणीजे महानुभाव । संत साधू ।।**

देव ओळखण्यासाठी आणि जन्माचे सार्थक होण्यासाठी सत्संग आवश्यक असल्याचे समर्थ सांगतात. त्याशिवाय देवाची ओळख होत नाही. परंतु सदगुरूंच्या योग्य मार्गदर्शनाने आणि कृपाप्रसादे मात्र हे शक्य होते. मग हे संत कसे ओळखावे? त्यांची संगती कशी धरावी? त्याचे मार्गदर्शन समर्थ मनाला करतात. ज्याने आत्मस्वरूप देव ओळखला त्या संतांना ओळखून त्यांची संगती धरायला हवी. सुखानंदकारी आणि कैवल्य म्हणजे मोक्षाची वाट सुलभ करणारा असे प्रभू श्रीरामचंद्र मात्र भक्ताची उपेक्षा कदापि करीत नाही. ही धारणा पक्की असावी. पुढील श्लोकात मनाला बोधीत करताना म्हणतात-

**सदा सर्वदा राम सन्निध आहे ।**
**मना सज्जना सत्य शोधून पाहे ।**
**अखंडित भेटी रघुराज योगु ।**
**मना सांडी रे मी पणाचा वियोगु ।। १८६ ।।**

या श्लोकात समर्थ प्रभू श्रीरामचंद्र हे सदैव आपल्यासोबत असल्याची ग्वाही मनाला देत आहेत. परंतु हे सत्य मनाने शोधून काढले पाहिजे. प्रभू श्रीरामचंद्र अखंडितपणे भक्ताच्या अवतीभवती आहेत. त्यांचा वियोग झालेला नाही. परंतु मन मुळी शंकेखोर असते. ते अविश्वास दाखवते. त्यातून निर्माण झालेला अविश्वास भक्ताला देवापासून दूर नेत असतो. तेव्हा मनाने शंकामुक्त झाले पाहिजे म्हणजे प्रभू श्रीरामचंद्रांची भेट होईल.

जगदगुरू तुकोबा यांचाही एक असा अभंग आहे. तो आपण नेहमी गुणगुणत असतो. हा अभंग देखील असाच आश्वासक आहे. देव सदैव आपल्या भक्तासोबत आहे ही अनुभूती देणारा आहे.

**जेथे जातो तेथे । तू माझा सांगाती ।**
**चालविसी हाती । धरूनियां ।।**
**चालो वाटे आम्ही । तुझा चि आधार ।**
**चालविसी भार । सवे माझा ।।**
**बोलो जातां बरळ । करिसी ते नीट ।**
**नेली लाज धीट । केले देवा ।।**

देव सदैव सांगाती म्हणजे सोबतच चालतो आहे. पावलो पावली त्याचे अस्तित्व जाणवते. त्याच्या आधारे जीवन प्रवास सुखकर होतो आहे. सारा भार देवाने स्वीकारला आहे .आपल्या आचार-विचारात त्याचे अस्तित्व जाणवते. परंतु त्यासाठी निरपेक्ष भक्तीभावाने त्याचे नामस्मरण घडायला हवे. संकटकाळी देव भक्ताच्या रक्षणासाठी धावून येतो हे तुकोबा आपल्या अभांगातून सांगतात.

**हाके सरिसी उडी । घालूनिया स्तंभ फोडी ।**
**ऐसा कृपावन्त कोण । माझे विठाई वाचून ।।**

**लोह चुंबकाचे बळे । उभे राहिले निराळे ।**
**तैसा तूं चि आम्हांठायी । खेळतोसी अंतरबाह्यी ।।**

अशा आंतरबाह्य सामावलेल्या देवाला ओळखायचा कसा? त्याच्या काही खुणा संत आपल्याला दाखवतात पण त्यासाठी सत्संग घडला पाहिजे.

**जय जय रघुवीर समर्थ!**

**-भाऊसाहेब देशमुख, अमळनेर**
**मो. : ९४२०३ ८९५४१**

## सूर्यदेव कसे प्रकट झाले? जाणून घ्या उत्पत्तीची कथा





ग्लोबल महातेज वृत्तसेवा

ज्योतिषशास्त्रात नवग्रहांना महत्त्व आहे. त्यात सूर्यदेवांना विशेष महत्त्व असून सूर्यदेवांना ग्रहांचा राजकुमार म्हटले जाते. सूर्यदेवाला ग्रहासह देवाचा देखील दर्जा प्राप्त आहे. कलियुगात सूर्य हे एकमेव देव आहेत, की ज्यांचे पृथ्वीवरून दररोज दर्शन होते. केवळ सूर्यामुळे पृथ्वी तेजस्वी आहे, असे मानले जाते. मान्यतेनुसार नियमितपणे सूर्यदेवांची पूजा केल्याने व्यक्तीला तेजस्वी आणि सकारात्मक शक्ती प्राप्त होते. सूर्यदेवांशिवाय पृथ्वीवरील जीवन अशक्य आहे, म्हणून वेदांमध्ये सूर्यदेवांना जगाचा आत्मा देखील म्हटले आहे. पण सूर्यदेव कसे प्रकट झाले? हा प्रश्न अनेकांना निर्माण होतो आणि हे स्वभाविक आहे.

### असा झाला सूर्यदेवाचा जन्म

पौराणिक कथेनुसार ब्रह्माजींचा मुलगा मरीची आणि मरिचीचा मुलगा महर्षी कश्यप याचा विवाह प्रजापती दक्ष यांची कन्या दिती आणि अदिती यांच्याशी झाला होता. अदितीला दैत्य आणि देवांचे आपसात भांडण झाल्याचे पाहून वाईट वाटले. त्यानंतर आदितीने सूर्यदेवांची पूजेसह तपश्चर्ये सुरू केली. तपामुळे प्रसन्न होऊन सूर्यदेवांनी त्यांना वरदान मागायला सांगितले. त्यावर अदितीने पुत्र म्हणून आपल्या पोटी जन्म घेण्याचे वरदान सूर्यदेवांकडून मागितले. त्यानंतर सूर्यदेवांनी हे वरदान दिले आणि अदिती गरोदर राहिली. यानंतरही त्यांनी आपली कठोर तपश्चर्या सोडली नाही. याचा अदितीच्या तब्येतीवर वाईट परिणाम होईल अशी चिंता महर्षी कश्यप यांना वाटू लागली. महर्षी कश्यप यांनी अदितीला समजावले तेव्हा ती म्हणाली की मुलाला काहीही होणार नाही, कारण ते स्वतः सूर्यदेवांचे रूप आहे. त्यानंतर अदितीने एक तेजस्वी बालकाला जन्म दिला. अदितीच्या पोटी जन्म घेतल्याने या बालकाचे नाव आदित्य पडले, आदित्या हा बालक दुसरा कोणी नाही तर साक्षात सूर्यदेव. त्यानंतर सूर्यदेवांनी देवतेने दानवांचा नाश केला आणि देवांचे रक्षण केले.

## सूर्यदेव आणि त्यांची विविध रूपे, महत्त्व

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

सूर्यदेव आणि त्यांची विविध रूपे तसेच धार्मिक वैशिष्ट्ये आणि महत्त्व अतिशय महत्त्वपूर्ण मानले जाते.

### १) तेजतत्त्वाच्या देवता

समष्टी स्तरावर 'सूर्य' आणि व्यष्टी स्तरावर 'अग्निदेव' या तेजतत्त्वाच्या प्रधान देवता आहेत. सूर्यदेव आणि अग्निदेव हे संपूर्ण सृष्टीला तेज (ऊर्जा) आणि प्रकाश हे दोन्ही देतात. त्यामुळे सृष्टीतील सर्व प्राणीमात्रांचे जीवन अधिक प्रमाणात सूर्य आणि अल्प प्रमाणात अग्निदेव यांच्यावर अवलंबून आहे.

### २) सूर्यदेवातील तेजाचे प्राकट्य

सूर्यदेवातील दैवी तेज आणि सौरऊर्जा यांचे प्राकट्य पुढील चार प्रकारांमध्ये होते.

**सूर्यप्रकाशकण :** जेव्हा तेजाचे बिंदूस्वरूप सूक्ष्मतम कण एकत्र येतात, तेव्हा प्रकाशकणांची निर्मिती होते. प्रकाशकणांमुळे एखादी वस्तू किंवा व्यक्ती तेजस्वी दिसते.

**सूर्यकिरण :** जेव्हा सूर्याचे अनेक प्रकाशकण एका सरळ रेषेत कार्यरत होतात, तेव्हा 'सूर्यकिरणांची' निर्मिती होते. सूर्यकिरणांमुळे पृथ्वी उजळून निघते.

**सूर्यप्रकाशाचे गोळे :** सूर्यापासून निर्माण होणारे किरण जेव्हा गोलाकारात गतीमान होतात, तेव्हा प्रकाशाच्या गोळ्यांची निर्मिती होते. अंतरिक्षात जेव्हा वायूच्या प्रकोपामुळे चक्रीवादळासारखे विवर निर्माण होतात, तेव्हा त्या विवरात कार्यरत असणारे सूर्यकिरण गोलाकारात गतीमान होऊन प्रकाशगोळ्यांची निर्मिती होते. त्यामुळे अंतरिक्षातील विशिष्ट



भाग तेजस्वी दिसतो.

**सूर्यप्रकाशाचा झोत :** जेव्हा अनेक सूर्यकिरणांचा समूह एकत्रितरित्या एकाच दिशेने प्रक्षेपित होतो, तेव्हा सूर्याच्या प्रकाशझोतांची निर्मिती होते. जेव्हा आकाशात एखादा मोठा ढग येऊन सूर्याला झाकतो, तेव्हा सूर्याचे किरण प्रकाशझोतांच्या रूपाने विविध दिशांना प्रक्षेपित होतात.

### ३) सूर्याशी संबंधित काही महत्त्वाची सूत्रे

**शिवाच्या त्रिनेत्रांचे प्रतीक :** 'सूर्य, चंद्र आणि अग्नि' हे अनुक्रमे 'अर्क', 'चंद्र' आणि 'वैश्वानर' या नावाचे शिवाचे तीन नेत्र आहेत. 'अर्क' हा शिवाचा उजवा डोळा, 'चंद्र' हा शिवाचा डावा डोळा आणि 'वैश्वानर' हा शिवाच्या कपाळावरील तिसरा डोळा, यांचे प्रतीक आहे. 'अर्क' हा 'अजानज लोकातील' सूर्य आहे, तर 'वैश्वानर' हा 'कर्मदेव लोकातील' सूर्य आहे. शिवाच्या या त्रिनेत्रांमुळे तो विश्वात सर्वत्र पाहू शकतो.

**कुंडलिनीनाड्यांपैकी एक प्रमुख नाडी :** मनुष्य आणि देवता यांच्या देहांत 'चंद्रनाडी, सूर्यनाडी आणि सुषुम्नानाडी', अशा तीन प्रमुख कुंडलिनीनाड्या आहेत. यांतील 'सूर्यनाडी' ही सूर्याशी संबंधित असून ती देहात उजव्या बाजूला असते.

**सूर्यलोकाचे ब्रह्मांडातील स्थान :** उच्च स्वर्गलोक आणि महर्लोक यांच्यामध्ये सूर्यदेवाचे निवासस्थान असलेला सूर्यलोक आहे.

**पितरांशी संबंधित देवता :** व्यक्तीचे वडील, आजोबा आणि पणजोबा हे अनुक्रमे वसु, रुद्र आणि आदित्य या गणांमध्ये येतात. अशा प्रकारे सूर्यदेवाचा संबंध पितरांशी आहे.

**अर्यमा देव :** सूर्याचे 'अर्यमा' हे रूप डोळ्यांना तेज आणि दृष्टी प्रदान करते. 'अर्यमा' हा देव पितरांशी संबंधित आहे.

**अधिपती देवता :** 'सूर्य' हा ब्रह्मांडातील समस्त ग्रह आणि तारे यांचा अधिपती आहे.

**'७' या अंकाचा संबंध :** संख्याशास्त्रानुसार '७' हा अंक सूर्याशी संबंधित आहे.

**आठवड्यातील वार :** हिंदू कालगणनेनुसार आठवड्यातील 'रविवार' हा सूर्यदेवाशी संबंधित आहे.

**१२ राशींपैकी संबंधित रास :** सूर्य हा 'सिंह' राशीचा स्वामी आहे.

**देवीच्या कृपेने सूर्याला पूर्णत्व प्राप्त होणे :** सूर्याला सावित्रीदेवीमुळे तेज आणि वेदमाता गायत्रीदेवीमुळे वेद यांची प्राप्ती झाली आहे. त्यामुळे सूर्य देवाला पूर्णत्व प्राप्त झाले आहे.'

## सूर्य : आक्रमक, बलवान ग्रह!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

सूर्य हे आक्रमकतेचे भयंकर आणि बलवान ग्रह म्हणून मानले जातात.

### सामान्य वैशिष्ट्ये

ज्योतिषशास्त्रात सूर्याला रवी किंवा सूर्यदेव म्हटले जाते. सूर्य हे पुरुषार्थी वर्ण आहेत. त्यातून निर्माण होणाऱ्या उष्णतेमुळे त्यांना सौम्य घातक मानले जाते. आधुनिक ज्योतिषात ते सिंह राशीवर राज्य करते. ते मेष राशीमध्ये उच्चीचा आणि वाढीवर आहेत तर ते तूळ राशीमध्ये नीचेचा आहेत. संस्कृतात त्यांना आत्मकारक म्हणतात, ज्याचा अर्थ आत्म्याचा सूचक असा आहे.

सूर्य हे अहंकार, सन्मान, दर्जा, समृद्धी, चैतन्य आणि शक्ती या पितृत्वाच्या वर्णांचे सूचक आहेत. मेष, सिंह आणि धनू या अग्नी राशींसाठी सूर्यदेव अत्यंत फायदेशीर आहेत. ज्वलंत स्वभावामुळे सूर्य पित्त तत्त्वाचे आहेत. सूर्यदेवांना प्रसन्न ठेवण्यासाठी बोटावर लाल माणिक घालता येते.

सूर्य आपल्याला चैतन्य, शक्ती आणि कोणत्याही प्रतिकूल घटनांपासून प्रतिकारशक्ती देतात. हे भौतिक वर्णांच्या विकासासाठी थेट जबाबदार आहे. बलवान सूर्य व्यक्तीला चांगली बुद्धी, समृद्धी, संपत्ती, सौभाग्य, बुद्धी, उच्च आकांक्षा आणि औषधाचे ज्ञान यासारखे गुण प्रदान करतात. हे मंदिर आणि इतर पवित्र स्थानांसह व्यक्तीचे आध्यात्मिक संबंध देखील नियंत्रित करते.

वैद्यकीय ज्योतिषशास्त्रानुसार सूर्यग्रहाचा मानवी मणक्यावर प्रभाव पडतो. पिंगळा नाडी, जी सूर्याद्वारे दर्शविली जाते. प्रत्यक्षात उजव्या बाजूला मणक्याच्या पायथ्यापासून उगम पावते, वर चढते आणि उजव्या नाकपुडीत संपते.

### सूर्यदेवांची पौराणिक कथा

वैदिक ज्योतिषशास्त्रात सूर्यदेवांना नवग्रहांची मुख्य देवता मानली जाते. वैदिक ज्योतिषशास्त्रातील सूर्यदेव हे ७ घोडे किंवा सात मस्तके असलेल्या १ घोड्याने चालवलेल्या रथावर चालणारा पुरुष म्हणून चित्रित केले आहेत. ही सात मस्तके मानवी शरीरातील ७ चक्रांचे प्रतिनिधित्व करतात. सूर्यदेवांकडे २ हातांनी प्रत्येक हातात कमळ धारण केलेले आणि ४ हातांच्या रूपात कमळ, शंख (शंक), चक्र आणि गदा धारण केलेले देव म्हणून देखील पाहिले जाते. त्यांना भगवान श्रीकृष्ण यांचे शौर्य किंवा विश्वरूपाचा डोळा असेही म्हणतात. योगायोगाने दानवांसह सर्वजण सूर्यदेवांची पूजा-अर्चा करतात.

सूर्यदेव एक कुटुंब आहे ज्यात शरण्या, रागी आणि प्रभा या तीन राण्या आहेत. शरण्य ही सत्यव्रत आणि जुळे यम आणि बहीण यमी यांची आई होती. नंतर शरण्यने अश्विन जुळ्या मुलांना जन्म दिला, ज्यांनी देवतांना वैद्य आणि दैवी घोडेस्वार म्हणून काम केले. शरण्यला सूर्याची तीव्र उष्णता सहन करता आली नाही आणि तिने स्वतःची छाया नावाची वरवरची सावली निर्माण केली. तिने छायाला सूर्यदेवांची पत्नी म्हणून काम करण्यास सांगितले. छायाने नंतर सारर्णी मनु आणि शनी नावाच्या दोन मुलांना आणि ताप्ती आणि विष्ठी या दोन मुलींना जन्म दिला.



पुढे शनी कर्माचा स्वामी झाला तर यम मृत्यूचा स्वामी झाला.

### ज्योतिषात सूर्यदेवांची भूमिका

सूर्य हा चंद्र, मंगळ आणि गुरूचा मित्र आहे तर शनी आणि शुक्राचा शत्रू आहे. बुध मात्र तटस्थपणे वागतो. मेष राशीमध्ये सूर्यदेव १० अंशांवर वरचे असतात आणि तुळ राशीमध्ये १० अंशांनी दुर्बल होतो. सूर्यदेवांच्या रहिवाशांसाठी भाग्यवान रंग केशरी, केशर आणि हलका लाल आहेत. सूर्य सहसा भगवान शिव, रुद्र, नारायण आणि सच्चिदानंद यांच्याशी संबंधित आहे. सिंह, मेष आणि धनु यांसारख्या अग्नी राशींसाठी सूर्य अत्यंत फायदेशीर आणि बलवान आहे. हे मेष राशीमध्ये वाढत आहे, तर सिंह राशीला मूळ त्रिकोण किंवा मूलत्रिकोना चिन्ह मानले जाते. जेव्हा सूर्यदेव बलवान असतात तेव्हा राशीला यश आणि समृद्धी मिळते. आरोग्य आयुष्यभर स्थिर आणि मजबूत स्थितीत असते. लग्नातील मजबूत सूर्य व्यक्तीला उत्साही आणि तंदुरुस्त ठेवतात. लग्नातील सूर्याचे सकारात्मक प्रभाव लोकांना बलवान आणि शक्तिशाली बनवितात. अशा व्यक्तीला कोणतीही गोष्ट सांगण्याआधी भावना कशी धरून ठेवावी आणि परिस्थितीचे मूल्यांकन कसे करावे हे माहीत असते. व्यक्ती निश्चित आणि जबाबदार असेल. त्यांच्या सभोवतालच्या लोकांना हा आत्मविश्वास अहंकार किंवा गर्विष्ठपणाचे लक्षण वाटेल. पण हे खरे नाही. सूर्यदेवांच्या प्रभावामुळे एखाद्या व्यक्तीला सरकारी क्षेत्रात स्थान मिळण्याची शक्यता आहे. हे एखाद्या व्यक्तीला तत्त्वनिष्ठ आणि शिस्तबद्ध, प्रभावशाली, चांगले आयोजन कौशल्य, विश्लेषक, निर्माता आणि प्रगती करत असताना यश मिळविण्यास आवडणारी व्यक्ती बनण्यास मदत करते.

तथापि, तूळ राशीमध्ये सूर्यदेव सर्वांत कमजोर आहे. हे कुंडलीमध्ये स्थित इतर अशुभ ग्रहांच्या संयोगाने नकारात्मक प्रभाव देखील दर्शवू शकते. लग्नातील कमकुवत सूर्यदेव मूळ रहिवाशांच्या खराब आरोग्याशी संबंधित असू शकतो. यामुळे इतर ग्रहांची कामगिरी कमी होत आहे. सूर्यदेवांचा इतर ग्रहांशी संबंध महत्त्वाचा आहे आणि सूर्यदेव इतर ग्रहांवर चढत आहे की उतरत आहे हे तपासणे आवश्यक आहे. सूर्यदेव एखाद्या व्यक्तीच्या एकूण व्यक्तिमत्त्वावर प्रभाव टाकतो. तथापि, कमकुवत सूर्यदेव वाईट परिणाम देऊ शकतो.

### सूर्यदेवांच्या दशा आणि अंतरदशा काय आहेत?

इतर ग्रहांप्रमाणे सूर्यदेवांची स्वतःची महादशा आहे जी सहा वर्षे टिकते. ही सूर्यदेवांची सर्वांत शक्तिशाली विषोमत्तारी महादशा मानली जाते. ग्रहाचे सूर्यदेव हे सूर्यमालेतील सर्वांत शक्तिशाली पिंड असल्यामुळे ते इतर सर्व ग्रहांवर नियंत्रण ठेवतात. ही सूर्य महादशा हानिकारक आणि फायदेशीर दोन्ही असू शकते.

सूर्यदेव कमजोर असतील तर महादशा अशुभ असेल. सूर्याच्या ६ व्या, ८ व्या आणि १२ व्या भावात शनी, राहू, केतू आणि मंगळाच्या संयोगाने स्थिती आल्याने याचा परिणाम होतो. राशीच्या व्यक्तीला संपत्तीची हानी होण्याची शक्यता आहे, अशुभ कामात अडकू शकते. प्रतिष्ठेची हानी होईल आणि पिता-सूर्यदेव यांच्या नात्यात दुरावा येईल. जीवन दुःखाने भरलेले असेल.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)